नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २८३ Issue - 283 | वार शनिवार दि. १ मार्च २०२५ Blow- Saturday Date 1 March 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# हिमस्खलनामुळे ५७ कामगार गाडले गेले; १६ जणांना वाचवण्यात यश

## बद्रीनाथ मंदिराजवळ भीषण दुर्घटना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : उत्तराखंडमधील चमोली येथे हिमस्खलनामुळे ५७ कामगार बर्फाखाली गाडले गेले असण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उत्तराखंडच्या काही भागांत सुरू असलेल्या बर्फवृष्टी दरम्यान ही दुःखद घटना घडली आहे. वृत्तानुसार, चमोली येथील बद्रीनाथ धाम येथील माना गावाजवळील हिम नदीखाली गाडलेल्या ५७ कामगारांपैकी १६ कामगारांना वाचवण्यात यश आले आहे. उर्वरित ४१ कामगारांचा शोध सुरू आहे.

उत्तराखंडच्या मुख्य सचिव राधा रतुरी यांनी सांगितले की, चमोली जिल्ह्यातील बद्रीनाथजवळील माना येथे हिमस्खल झाल्यामुळे ५७ कामगार गाडले गेले आहेत. त्यापैकी १६ जणांना बाहेर काढण्यात आले आहे. उर्वरित कामगारांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

हे सर्व कामगार बीआरओशी करार केलेल्या कंत्राटदाराचे असल्याचे सांगण्यात येत आहे. चमोलीच्या काही भागांत गेल्या काही दिवसांपासून जोरदार बर्फवृष्टी होत आहे. बद्रीनाथ मंदिरापासून तीन किलोमीटर अंतरावर महामार्गाजवळ हा अपघात झाला.

उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनीही या अपघातावर पहिली प्रतिक्रिया दिली आहे. चमोली जिल्ह्यातील माना गावाजवळ बीआरओकडून सुरू असलेल्या बांधकामादरम्यान अनेक कामगार हिमस्खलनाखाली दबल्याची दुःखद बातमी कळाली. आयटीबीपी, बीआरओ आणि इतर बचाव पथकांकडून मदत आणि बचाव कार्य सुरू आहे. सर्व कामगार बांधवांच्या सुरक्षेसाठी मी भगवान बद्री विशालकडे प्रार्थना करतो, असे मुख्यमंत्री धामी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हणाले.

पोलीस मुख्यालयाचे प्रवक्ते आयजी नीलेश आनंद यांनी दुजोरा दिला की, हिमस्खलनात अडकलेल्या ५७ कामगारांपैकी १० जणांना वाचवण्यात आले आहे आणि त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना मानाजवळील लष्करी छावणीत दाखल करण्यात आले आहे.

बचावकार्यात अडथळे

या अपघातानंतर बचाव कार्यात तीन ते चार रुग्णवाहिका देखील सहभागी झाल्या आहेत. बचाव पथके हिमस्खलनाच्या ठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र जोरदार हिमवृष्टीमुळे बचाव पथकांना घटनास्थळी पोहचण्यात अडथळे येत आहेत. चमोलीचे संदीप तिवारी म्हणाले की, मुसळधार बर्फवृष्टीमुळे तिथे हेलिकॉप्टर सेवा वापरता येत नाही. संवाद साधण्यासाठी सॅटेलाइट फोन किंवा इतर उपकरणेही नाहीत.उत्तराखंडमध्ये चार धाम यात्रेची नुकतीच घोषणा करण्यात आली आहे. आता ही दुर्घटना बद्रीनाथच्या अगदी जवळ घडली असल्याने, बर्फ हटवण्याचे काम खूप वेगाने केले जात आहे, रस्ता वेळेत मोकळा करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. याचबरोबर गेल्या दोन दिवसांपासून डोंगराळ भागात हवामान खूपच खराब आहे. उत्तराखंडसह, हिमाचल प्रदेशातील अनेक भागात मुसळधार पाऊस पडला आहे, नद्या दुथडी भरून वाहत आहेत. अनेक वाहनेही वाहून गेली आहेत.



## यंदाचा उन्हाळा राहणार कडक, हवामान विभागाचा अंदाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : यंदाच्या उन्हाळ्यात (मार्च ते मे) देशभरात कमाल, किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील. उष्णतेच्या लाटांची संख्या आणि तीव्रता जास्त राहील. संपूर्ण देशभरात यंदा कडक उन्हाळा जाणवेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, यंदाच्या उन्हाळ्यात म्हणजे मार्च - मे दरम्यान देशभरातील कमाल, किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहणार आहे. दक्षिण भारत वगळता राज्यासह देशभरात उष्णतेच्या लाटांची संख्या आणि तीव्रता जास्त राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे यंदा उन्हाळा जास्त तापदायक ठरण्याचा अंदाज आहे. राज्यात उन्हाळी पाऊस सरासरीपेक्षा जास्त पडण्याची शक्यता आहे. मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्यामुळे उन्हाळी पाऊस नुकसानकारक ठरण्याचा अंदाज आहे. प्रशांत महासागरात सध्या सक्रीय असलेला ला निना अगोदरच कमकुवत आहे. तो आणखी कमकुवत होताना दिसत आहे. एप्रिल अखेर ला निना निक्रीय होण्याची शक्यता आहे. तसेच लगेच एल निनोही सक्रीय होण्याची शक्यता नाही. त्यामुळे नैऋत्य मोसमी पावसाच्या पार्श्वभूमीवर प्रशांत महासागरात कोणतीही स्थिती नसेल, याचा देशभरातील पावसाळ्यावर सकारात्मक परिणाम होण्याची अपेक्षा हवामान विभागाने व्यक्त केली आहे. फेब्रुवारी महिना सरासरीपेक्षा उष्ण ठरला आहे. देशात फेब्रुवारी महिन्यात कमाल तापमान सरासरी २७.५८ अंश सेल्सिअस असते, यंदा ते २९.०७ अंश सेल्सिअस होते. किमान तापमान १३.८२ अंश सेल्सिअस असते, ते १५.०२ अंश सेल्सिअस होते. सरासरीपेक्षा कमाल तापमान १.४९ तर किमान तापमान १.२० अंश सेल्सिअसने जास्त होते. १९०१ पासूनच्या नोंदीनुसार यंदा फेब्रुवारी दुसऱ्या क्रमांकाचा उष्ण महिना ठरला आहे. २०२३ च्या फेब्रुवारीत २९.४४ अंश सेल्सिअसची नोंद झाली होती.

# ‘सीईटी-अटल’ उपक्रमात एक लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षणातील संधी आणि क्षमता ओळखण्यासाठी मदत व्हावी यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून ‘अटल’ उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत अवघ्या दीड महिन्यांत एक लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. तसेच या उपक्रमांतर्गत ५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या उपक्रमाचा अधिकाधिक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे.

शिक्षणातील संधी आणि क्षमता ओळखण्याबरोबरच विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढविण्यासाठी तसेच विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षांचा सराव करता यावा यासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत ‘अटल’ उपक्रम सुरू करण्यात आला आहे. ‘अटल’ उपक्रमाअंतर्गत मॉक टेस्ट्स आणि सायकोमेट्रिक टेस्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतांचा शोध घेता येतो. या सराव परीक्षांमुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर त्या विषयातील शैक्षणिक संधी आणि प्रवेश परीक्षांच्या पूर्वतयारीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाताना येणारा ताण कमी कमी होण्याबरोबरच शैक्षणिक आयुष्यात पुढे जाण्यास प्रोत्साहन मिळणार आहे. १६ जानेवारी २०२५ रोजी सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत अवघ्या दीड महिन्यांमध्ये १ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी नोंदणी करावी, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले आहे. ‘अटल’ उपक्रमात राज्यातील विविध महाविद्यालयांचा सहभाग असून कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी आणि व्यवस्थापन या विद्याशाखांचा समावेश आहे. या उपक्रमाची विविध माध्यमातून प्रचार आणि प्रसिद्धी करण्यात येत आहे. आतापर्यंत १ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी झाली असली तरी ५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांची नोंदणी करण्याचे उद्दिष्ट आहे, असे पाटील यांनी सांगितले.

**अधिकाधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे चंद्रकांत पाटील यांचे आवाहन**

परीक्षेबरोबरच करिअरला प्रोत्साहन देणार

सायकोमेट्रिक टेस्टद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार व त्यांच्या क्षमतांनुसार योग्य शैक्षणिक आणि व्यावसायिक विषयांची निवड करण्यास मदत होईल. हा उपक्रम केवळ परीक्षा तयारीपुरते मर्यादित नसून, विद्यार्थ्यांना शैक्षणिक करिअरला प्रोत्साहन देणारा आहे, असेही पाटील यांनी यावेळी सांगितले. ‘अटल’ उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील शहरी भागाबरोबरच दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांचा सराव यामुळे करणे शक्य होणार आहे. तसेच परीक्षांचे वेळापत्रक, माहिती उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

# पुणे बलात्कार प्रकरणातील आरोपीला अटक; १२ दिवसांची पोलिस कोठडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यातील स्वारगेट एसटी स्थानकावर उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर मंगळवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास बलात्कार झाला. बलात्कारानंतर हा आरोपी जवळपास तीन दिवस पोलिसांना चकवा देत होता. अखेर सीसीटीव्ही फुटेज, श्वान पथक आणि ड्रोनच्या सहाय्याने पोलिसांनी आरोपीला गुणाट या गावातून मध्यरात्री अटक केली. यानंतर आरोपीला आज पुणे सत्र न्यायालयासमोर हजर करण्यात आले. दरम्यान या प्रकरणाच्या पुढील तपासासाठी आरोपीला पुणे न्यायालयाने १२ दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे. पुण्यातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या स्वारगेट बसस्थानकात महिलेवर अत्याचार झाल्याची घटना उजेडात आल्यानंतर याविरोधात सर्व स्तरांमधून संताप व्यक्त केला जात होता. विरोधकांकडून राज्य सरकार आणि पोलीस प्रशासनावर टीका केली जात होती. या दरम्यान आरोपी दत्तात्रय गाडे याला अटक करण्यात पोलिसांना यश आले. एसटी स्थानकातील २३ सीसीटीव्ही कॅमेरा आणि स्थानकाबाहेरील ४८ सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर दीड ते दोन तासांत आम्ही आरोपीची ओळख पटवली होती. गेल्या दोन दिवसांपासून आम्ही आरोपीच्या गावात जावून शोधमोहिम घेत होतो. पण आरोपी तेव्हा सापडला नाही. अखेर तो आज सापडला आहे. याकरता मी गावातील नागरिकांचे धन्यवाद देतो. त्या गावात भेट देऊन नागरिकांचा सत्कार करणार आहोत. तिथे ज्या-ज्या लोकांनी मदत केली, त्यांचं विशेष अभिनंदन करणार आहोत, असं पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार भावना आरोपीच्या अटकेनंतर व्यक्त केली. शेवटच्या माहितीवरून आम्ही आरोपीला पकडलं. शेवटची माहिती आली की तो कुठेतरी पाणी पिण्यासाठी आला होता. तो कोणालातरी दिसला आणि मग तो तिथून पळाला. ड्रोनच्या सहाय्याने जी दिशा दिसली, त्यातून त्याला



अटक करण्यात आली. ज्याने शेवटची माहिती दिली, त्याला एक लाखांचं बक्षिस देण्यात येणार आहे. त्याव्यतिरिक्त गावासाठी काय करता येणार, याचाही आम्ही विचार करणार आहोत, असेही अमितेश कुमार यावेळी म्हणाले. पुणे बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडे याने आत्महत्येचा प्रयत्न केल्याची माहिती समोर येत आहे. या संदर्भात बोलताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, असं आहे की या प्रकरणातील सर्व गोष्टी तपासात समोर आल्यानंतर त्यावर सविस्तर बोलणं योग्य आहे. आता पोलिसांनी आरोपीला अटक केलं आहे. त्यानंतर आरोपीला आज न्यायालयात हजर केलं जाईल. त्यानंतर आरोपीची चौकशी होईल. तसेच काही टेक्निकल डिटेल्स आमच्याकडे आलेल्या आहेत. तसेच काही फॉरेन्सिक डिटेल्स देखील आलेल्या आहेत. याची सर्व माहिती एकत्र करून याबाबत बोलणं योग्य राहील.

**अधिकाऱ्यांनी लोकाभिमुखता, गतिशीलता आणि पारदर्शकता यावर भर द्यावा**

**१०० दिवसांच्या आराखड्यादरम्यान उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्र्यांकडून कौतुक**

# ‘एआय’च्या सहाय्याने सुप्रशासन राबवावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : लोकाभिमुखता, गतिशीलता आणि पारदर्शकता या सुप्रशासनामध्ये अतिशय महत्त्वाच्या बाबी आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे (एआय) येत्या काळात सर्वच क्षेत्रात मोठा बदल घडून येणार असून सुप्रशासन राबविताना कृत्रिम बुद्धिमत्तेचा अवलंब करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे १०० दिवसांच्या आराखड्यानुसार आतापर्यंत उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.

राज्य शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, त्या योजनांचा सर्वसामान्यांना सुलभतेने लाभ मिळावा या उद्देशाने प्रत्येक विभागाने १०० दिवसात करावयाच्या कामांचा कृती आराखडा सादर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ९ डिसेंबर २०२४ रोजीच्या बैठकीत दिले होते. या आराखड्यानुसार होत असलेल्या कामांचा मुख्यमंत्र्यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, क्षेत्रीय अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते. तर ६,८५४ अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे या बैठकीत सहभागी झाले होते. ऑनलाईन बैठकीला सर्व स्तरातील इतके अधिकारी उपस्थित असण्याचा हा एक विक्रमच होय. तालुका स्तरापर्यंतच्या अधिकाऱ्यांचीही यावेळी उपस्थिती होती.



विविध विभाग आणि पातळीवर उत्कृष्ट काम करीत असलेल्या १५ विभागांच्या कामांचे सादरीकरण यावेळी करण्यात आले. नाविन्यपूर्ण काम केलेल्या अधिकारी आणि कार्यालयांचे कौतुक करून त्यांना मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मंत्रालयापासून गाव पातळीपर्यंत विविध कार्यालयांमधील सर्व अधिकाऱ्यांनी नागरिकांना सेवा सुविधांचा लाभ सुलभतेने मिळवून देण्यासाठी तसेच त्यांचे समाधान होईल यासाठी प्रयत्न करावेत. सुप्रशासन असेल तेथे गुंतवणूक वाढते. महाराष्ट्र हे यादृष्टीने अग्रेसर राज्य असून यामध्ये आणखी वाढ होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आराखड्यानुसार शंभर दिवस पूर्ण झाल्यानंतर विभाग आणि जिल्हा पातळीवर या कामांचे समीक्षण आणि मूल्यमापन केले जाईल. त्या आधारावर उत्कृष्ट काम करणाऱ्या विभागांना १ मे रोजी सन्मानित केले जाईल. त्याचबरोबर ४० टक्क्यांपेक्षा कमी गुण मिळवणाऱ्या विभागांची नकारात्मक दखल घेतली जाईल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

प्रभावी कार्यवाहीसाठीचे मुद्दे

शंभर दिवसांच्या आराखड्यानुसार प्रभावी कार्यवाही करण्यासाठी विभागाचे संकेतस्थळ, नागरिकांचे सुकर जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयी व सुविधा, गुंतवणूक प्रसार, कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, ई ऑफिसचा वापर, नाविन्यपूर्ण उपक्रम, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी आदी मुद्दे ठरवून देण्यात आले होते.

निवड प्रक्रिया

राज्यातील ३६ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, ३६ जिल्हाधिकारी यांच्यामधून विभागीय आयुक्त पातळीवर छाननी करून प्रत्येकी सहा जणांची निवड करण्यात आली. त्यानंतर ग्रामविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी २ मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची तर २ जिल्हाधिकाऱ्यांची महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी निवड केली. २२ महानगरपालिका आयुक्तांमधून प्रशासनामार्फत ६ आयुक्तांची छाननी करण्यात येऊन नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांनी त्यापैकी २ आयुक्तांची निवड केली. ११ पोलिस आयुक्तांमधून गृह विभागाच्या प्रधान सचिवांनी ४ आयुक्तांची छाननी केली ज्यामधून अपर मुख्य सचिवांनी एका पोलिस आयुक्तांची निवड केली. त्याचप्रमाणे सहा विभागीय आयुक्तांमधून महसूल विभागाच्या अपर मुख्य सचिवांनी एका विभागीय आयुक्तांची निवड केली.

याचप्रमाणे सहा पोलिस परीक्षेत्रांमधून एका पोलिस महानिरीक्षकांची पोलिस महासंचालकांनी निवड केली. ३४ जिल्हा पोलिस अधीक्षकांमधून महानिरीक्षकांनी आठ पोलिस अधीक्षकांनी छाननी करून त्यापैकी गृह विभागाच्या प्रधान सचिवांनी दोन अधीक्षकांनी (पान २ वर...)

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### बचावकार्यात अडथळे

उत्तराखंडमधील चमोली येथे हिमस्खलनामुळे ५७ कामगार बर्फाखाली गाडले गेले असण्याची भीती व्यक्त केली जात आहे. उत्तराखंडच्या काही भागांत सुरू असलेल्या बर्फवृष्टी दरम्यान ही दुःखद घटना घडली आहे. चमोली येथील बद्रीनाथ धाम येथील माना गावाजवळील हिमनदीखाली गाडलेल्या ५७ कामगारांपैकी १६ कामगारांना वाचवण्यात यश आले आहे. उर्वरित ४१ कामगारांचा शोध सुरू आहे. चमोली जिल्ह्यातील बद्रीनाथजवळील माना येथे हिमस्खलन झाल्यामुळे ५७ कामगार गाडले गेले आहेत. त्यापैकी १६ जणांना बाहेर काढण्यात आले आहे. उर्वरित कामगारांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. हे सर्व कामगार बीआरओ-शी करार केलेल्या कंत्राटदाराचे असल्याचे सांगण्यात येत आहे. चमोलीच्या काही भागांत गेल्या काही दिवसांपासून जोरदार बर्फवृष्टी होत आहे. बद्रीनाथ मंदिरापासून तीन किलोमीटर अंतरावर महामार्गाजवळ हा अपघात झाला. हिमस्खलनात अडकलेल्या ५७ कामगारांपैकी १० जणांना वाचवण्यात आले आहे आणि त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना मानाजवळील लष्करी छावणीत दाखल करण्यात आले आहे. या अपघातानंतर बचाव कार्यात तीन ते चार रुग्णवाहिका देखील सहभागी झाल्या आहेत. बचाव पथके हिमस्खलनाच्या ठिकाणी पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र जोरदार हिमवृष्टीमुळे बचाव पथकांना घटनास्थळी पोहचण्यात अडथळे येत आहेत. चमोलीचे संदीप तिवारी म्हणाले की, मुसळधार बर्फवृष्टीमुळे तिथे हेलिकॉप्टर सेवा वापरता येत नाही.

## 'एआय'च्या सहाय्याने सुप्रशासन राबवावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान १ वरून..) निवड केली. सर्व आयुक्त / संचालक यांमधून यशदाच्या महासंचालकांनी सहा आयुक्त / संचालकांची छाननी केली ज्यामधून मुख्य सचिव यांनी दोन आयुक्त / संचालकांची निवड केली. तर सर्व विभागांच्या अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांमधून मित्रा च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सहा सचिवांची छाननी केली ज्यामधून उत्कृष्ट काम केलेल्या दोन सचिवांची निवड मुख्य सचिवांनी केली.

उत्कृष्ट कार्य केलेले १५ विभाग आणि कार्यालये

१) पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर २) पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा ३) विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, छत्रपती संभाजी नगर ४) बृहन्मुंबई पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई ५) गृह विभाग मंत्रालय ६) पिंपरी चिंचवड महानगरपालिका ७) ठाणे महानगरपालिका ८) जिल्हा परिषद कार्यालय, धुळे ९) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर १०) जिल्हा परिषद कार्यालय, चंद्रपूर ११) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव १२) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे १३) आदिवासी आयुक्त कार्यालय १४) वैद्यकीय शिक्षण आयुक्त कार्यालय आणि १५) मृद व जलसंधारण कार्यालय, मंत्रालय यांचा समावेश आहे.

लक्षणीय कामगिरी करणाऱ्या १५ अधिकाऱ्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

पालघर पोलिस अधीक्षक : बाळासाहेब पाटील

सातारा पोलिस अधीक्षक : समीर अस्लाम शेख

छत्रपती संभाजीनगर आयजी : वीरेंद्र मिश्रा

मुंबई पोलिस आयुक्त : विवेक फणसाळकर

गृह, अतिरिक्त मुख्य सचिव : इकबालसिंह चहल

आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका : शेखर सिंग

आयुक्त, ठाणे महापालिका : सौरभ राव

मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळे, जिप: विशाल नारवाडे

मुख्य कार्यकारी अधिकारी, चंद्रपूर, जिप: विवेक जॉन्सन

जिल्हाधिकारी, नागपूर : विपीन इटनकर

जिल्हाधिकारी, जळगाव : आयुष प्रसाद

विभागीय आयुक्त, पुणे : डॉ. पुलकुंडवार


आदिवासी आयुक्त : लिना बनसोडे

आयुक्त वैद्यकीय शिक्षण : राजीव निवतकर

सचिव, मृद व जलसंधारण : गणेश पाटील

# सकल जनवादी छत्रपती शिवराय

## लेखक प्रकाश पवार– पुस्तक परिचय : शिवराय चरित्र सामाजिक न्याय दृष्टिकोन मूल्य विश्लेषण लेखन प्रयत्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आगामी दशकात ज्ञानाचे सपाटीकरण होणार आहे. तरीही ज्ञानाची संशोधन अभिवृत्ति शिल्लक राहणार आहे. संशोधन अभिवृत्तीला प्रादेशिकता, अस्मिता, वंशवाद ,आणि दैवतीकरण हे गुण चिकटवले जाणार आहेत. आजचे सगळे ज्ञान विश्व जवळपास या सगळ्या गुणांच्या आणि निकषाच्या आधारे पुढे निघाले आहे. इतिहास ही एक ज्ञान शाखा असून ती आता साम्राज्यवाद्यांनी वंशवाद्यांनी वास्तवापासून दूर हटवणे चालू केले आहे. इतिहासाला समग्रता असते. .इतिहासाला अनामिकता असते .इतिहासाला काळाचे तत्कालीन संदर्भात इतिहासाला जागतिक प्रादेशिक मर्यादा आणि प्रभावाने आक्रमणे कारणीभूत असतात. स्थानिक इतिहासाला तंत्रज्ञान शस्त्र भाषा या सर्वांच्या मर्यादा सर्व इतिहासकाळात असलेल्या दिसून येतात. ज्यांचे शस्त्र त्यांचे शास्त्र त्यांची सत्ता हा जगाच्या इतिहासाचा विजयाचा वर्चस्वाच सूत्र ठरले आहे. अशा कालखंडात इतिहास हा स्वयंवशवादाचा इतिहास फक्त मान्य करणार अशा प्रवृत्ती वाढत असताना अनामिकांचा समग्र इतिहास हा मुद्रीत होण्याची आवश्यकता असताना. ती अद्याप पूर्ण झालेली नसताना .व्यक्ति केंद्री, मूल्य प्रक्षेपित असा इतिहास चरित्र नायकांच्या भोवती गुंफणे ही भक्ती ठरते. हा थोडा त्या समकाळातील नीती आणि मूल्यांच्या वर चढवलेले आवरणे ठरतात,आणि व्यक्ती चरित्र नायकाला शतकांचा द्रष्टा ठरवण्याचे प्रयत्न अभ्यासक इतिहासकार करीत असतात. इतिहासकारांच्या सुद्धा दृष्टिकोनाच्या संदर्भ साधनांच्या मर्यादा असतात त्यांच्या जाणीव आणि नेणीव इतिहास लेखनावर परिणाम करतात आणि त्यामुळे सोयीची संदर्भ साधने वापरली जातात आणि त्यांच्या लेखनातून इच्छा असोअगर नसो परंतु सा कारली जाणारी साहित्यकृती ही अशीच सम्यकतेचा भास तयार करते आणि निती मूल्यांच्या स्वयंप्रक्षेपणाचा मारा अशा लेखनात आढळून येतो अशाच स्वरूपाच मौलिक मोठे जाडजूड पुस्तक सकल जनवादी छत्रपती शिवराय हे प्रकाश पवार लिखित पुस्तक महाराष्ट्राच्या विचार विश्वात सकाळ प्रकाशन विभागाकडून आले आहे.

बृहद ग्रंथ आणि जवळपास पाच पानाच्या संदर्भ ग्रंथाची यादी आणि आणि मोठी व्यक्ती नामसूची ही वाचून वाचक थोडा भांबावेल पण तरीही या पुस्तकाचे मराठी वाचक विश्वाच्यावतीने इतिहास अभ्यासकाच्या वतीने नितांत प्रारंभ स्वागतच करणे आनंद एक ठरेल उत्कृष्ट मुखपृष्ठ सुंदर नकाशे व रेखाचित्र यांची मांडणी आणि गोपाळ नांदूरकरांचे प्रभावी मुखपृष्ठ यामुळे ऐतिहासिकता दृश्यातच प्राप्त होते अष्टमुद्रा नाणी कोश समन्वयाचा तराजू गडकोट किल्ल्याची बांधणी एकूणच प्राचीन्ता असा समिश्र चित्रांची एकत्रित रचना मुखपृष्ठावर करून खूप आकर्षकता प्राप्त केली आहे या पुस्तकातील ५४६ पृष्ठाच्या पानावरील नकाशा ची यादी सकल जनवादी मूल्य व्यवहार परंपरांनी नव्हता राजकीय अर्थकारण जग आणि शिवराय हिंदुस्तानी आणि शिवराय स्वराज्याचा विस्तार स्वराज्य स्थापना पूर्व पिटी का आणि पुरस्कार प्रस्तावना प्राकतं न असे विभाग पाडून सकल जनवादी छत्रपती शिवराय ही विचारसरणी मांडण्याचा मूल्य विश्लेषणाचा अनोखा प्रयत्न या पुस्तकात केलेला आढळून येतो .

कुमार केतकर यांनी छत्रपती शिवरायांचे कालजय चरित्र या आपल्या भूमिकेत म्हटले आहे. की महाराष्ट्रात शिवाजी राजे यांच्या बद्दल खूप लेखन झाले आहे या नव्या मोठ्या ग्रंथाची गरज काय असा प्रश्न उपस्थित करून प्रकाश पवारांनी चरित्र लेखनाचे शिवधनुष्य पुन्हा का उचलले असे म्हटले आहे केतकरांनी म्हटल्या प्रमाणे सकलजनवादी आदर्श ची पुरेपूर आळख आपल्याला देशात महाराष्ट्रात नाही .भारतीय राज्यघटनेत या मूल्यांचा

जगभरात सेक्युलरिझम समाजवादाच्या चर्चा तेव्हा चालू नव्हत्या सामाजिक न्यायाची तत्वे तरीही महाराजांच्या प्रशासनात आढळून येतात म्हणून महाराजांचे जीवन कार्य मानवी स्वातंत्र्याकडे समतेकडे नैतिक तिकडे नेणाऱ्या आहे म्हणूनच हा सकल जनवादी छत्रपती शिवराय हे पुस्तक म्हणजे महाराजांचे चरित्र नव्हे तर सर्वकालीन शिवराय पवार यांनी आपल्या समोर ठेवले आहेत. केवळ तो इतिहास नाही .तर ते चरित्र आहे. असा केतकरांनी शुभेच्छा पर संदेश या पुस्तकाच्या प्रारंभी दिला आहे.

शुभेच्छा लेखनात अपेक्षा नाविन्य आणि नवे नित विश्लेषण हे अभिप्रेत असते ते करण्यात आले नाही ३० पानाच्या प्रस्तावनेच्या प्रदीर्घ लेखनात डॉक्टर रणधीर कुमार शिंदे यांनी सकल जनदृष्टीची प्रमेय सूत्रे देव देश धर्म यासाठी शिवराय हा कसा? पवार यांनी यथायोग्य मांडला आहे यापूर्वीच्या अनेक शिवचरित्रकारांच्या नावाची सूची लिहून त्यांनी स्वराज्य स्थापना पूर्व पिटी का .यासारख्या अनेक विभाग पवार यांनी पाडल्याचे सांगून शिवकार्याच्या फलस्वती दूरदृष्टी दृष्टिपणा नियमांसा आधुनिकतावादी दृष्टी व मानवतावादी प्रबोधनवादी शिवराय असा नवा विशेषणाचा वर्षाव प्रस्तावनेमध्ये डॉक्टर रणधीर शिंदे यांनी केला आहे त्यामुळे सकल जनवादी छत्रपती शिवराय ही या पुस्तकाची धर्मापलीकडे जाऊन नैतिक मूल्यांच्या विश्लेषणाची भूमिका वाचकाला समजून घेण्यास सोपी जाते .प्रस्तावनेत डॉ रणधीर शिंदे. हे राजा शिवाजी चे. कार्य हे बहुजन पूरक असलेले संघटन होते. म्हणजेच सर्वस्वी शिवाजी राजांचे सैन्य भाबड्या खेडवळ मावळ्यांचे नव्हते तर पूर्वम पार लढाऊ परंपरा असलेले स्थानिक मराठी कोळी महार रामोशी लढाऊ जातीचे होते पृष्ठ क्रमांक ६५ हा द ग गोडसे यांचा संदर्भ देऊन प्रस्तावनेत शिंदे म्हणतात. शिवकाळात निग्रह व अनुग्रह असा व्यवहार रूढ झाला तो राजकीय तत्त्व म्हणून मराठा इतिहासातील लोकहितासाकडे पवार पुन्हा पुन्हा वाचकांचे लक्ष वेधतात हे लोक व्यवहाराचा सहभाग व शिवरायांनी केलेल्या सुनियोजित संघटनांच्या असंख्य धागेद्वारे लेखक प्रकाश पवार यांनी शोधल्याचे शिंदे यांचे मत आहे.

प्रस्तावना मधील विषयाचे महत्त्व विषयाचे ज्ञान महात्म्य आणि समकालीन मांडणीतील मौलिकता गरज आणि आजवर झालेल्या या विषयावरील लेखनातील नवा प्रकार हा या पुस्तकात कितपत आहे हे दाखवणे अभिप्रेत होते .एकूणच राजा शिवाजी हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा इतिहास कालापासूनचा तो प्राण आहे. तो पुनर्स्थापित करण्यात अनेक अनेक इतिहासकारांनी दृष्टिकोनाच्या चुका केलेल्या आहेत ऐतिहासिक दृष्टिकोन धर्मविरोधी दृष्टिकोन समकालीन समाज व्यवस्था परकीय सत्तांची आक्रमणे स्थानिक स्वराज्य संघर्ष धर्म व्यवस्था व गावगाड्यातील अत्याचार एकूण भागवत संप्रदायाचा प्रभाव या सर्व देशी चालत आलेल्या सांप्रदायिक दृष्टिकोनाच्या सामाजिक संदर्भातून राजाशिवाजी यांचा इतिहास आजवर महाराष्ट्रातील मान्यवरांनी वादग्रस्त व नव्याने मांडलेला आहे .तिथल्या प्रभुत्व जाती आणि वर्गांना हा मान्य झालेला नाही. राजा शिवाजीचे जीवन चरित्र हा महाराष्ट्राचा सर्वांगीण भौगोलिक ,सांस्कृतिक आणि धार्मिक भाषिक अंगाने व्यापक लिहावयाचा इतिहास आजही अपूर्ण आहे. स्व प्रक्षेपित स्ववर्गीय समर्थनाचा इतिहास हाच राजा शिवाजी यांच्या वाट्याला आजवर आलेला आहे .त्यामुळे अनामिकांचा वंचितांचा हा राजा सकल जनवादी राजा म्हणून मांडणी करताना खूप नेनिवेचे संदर्भ मांडावे ही लागतील आणि ते पुरेशी पडणार नाहीत त्यासाठी इतिहास साधनांच्या नव्या संदर्भांचा शोध घेऊन मांडणी करण्याची नितांत गरज आहे.

राजा शिवाजी हा शत्रु भावी राजा नव्हता तो न्यायी राजा होता .हे सूत्र नैतिक मूल्यांच्या विशेषणाच्या केवळ विश्लेषणातून ते सतत जोडण्यातून हे न्याय सूत्र पुढे येणार नाही. राजा शिवाजी हा महाराष्ट्राच्या जीवनाचा न्यायाचाच एक महत् प्रयत्नआहे. असे असताना सोळाव्या शतकातील सर्व व्यक्तिरेखा आणि समाजजीवन प्रभुत्व धर्म व्यवस्था संस्कृत आणि भाषा प्राकृत यांचा संघर्ष राज्य व्यवस्थेच्या मर्यादा परकीयांच्या सर्व संघर्षाची कारणे ही या पुस्तकात अनेक प्रकारे मांडण्याचा सशक्त प्रयत्न केला गेला आहे. ही या पुस्तकाची फार मोठी जमेची श्रमाची कष्टाची बाजू आहे.

जात आणि धर्म या व्यवस्थेविरुद्ध राजा शिवाजी कसे लढले? हे या पुस्तकात प्रमुख्याने यायला हवे होते. ते आले नाही. धर्म ही निती नव्हती. तर ते वर्चस्व होते. हे आजही मान्य व प्रतीत होते आणि त्या दृष्टिकोनातून राजा शिवाजी यांच्या जीवनाचा मागोवा जाणीव आणि नेणीवणच्या आधारे घेतला गेला असता तर शिवाजी महाराज दक्षिण दिग्विजय लेखक श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनी संपादित केलेला दक्षिण दिग्विजय अंक आठवा यामधील ६४ लेखकांच्या लेखावरून जो निरंतर शिवरायांचा इतिहास एकांगी स्व समर्थनाचा कल्पना रम्य कादंबरीवजा शत्रुभावी शाहिरी गायनाचा इतिहास महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्या वीशिष्ट वर्गाने पोहोचवला आहे.

या सर्व राजा शिवाजीअंक या इतिहास पुस्तकास पुरेपूर उत्तर देत नाही . इतिहासातील नायकाच्या वाट्याला हे सर्व येथेच राजा शिवाजी हा अपवादात्मक श्रेष्ठ न्यायी समतावादी स्वातंत्र्यवादी दूरदृष्टीचा व समन्वयी समावेशक राजा असा होता. हे आता जगातील सर्व नैतिक मूल्यांच्या विश्लेषणाची राजकीय संदर्भ शोधून अनेक जण मांडू लागले आहेत .आजपर्यंत राजा शिवाजी हे धर्म रक्षणा पलीकडचा राजा या भूमिकेतून महाराष्ट्र प्रादेशिकता निर्माण करणारा महाराष्ट्र भाषा संवर्धित करणारा महाराष्ट्र अर्थकारण स्थापित करणारा महाराष्ट्र राजकारण प्रस्थापित करणारा असा हा दृष्टा राजा आता नव्याने पुढे येतो आहे .हे सूचिन्ह या पुस्तकांनी दाखवून दिले आहे. यातील नैतिक मूल्यांच्या बद्दल वाद होईल. स्व प्रक्षेपित मूल्य इतिहासातील नायकाला चिकटवणे आणि लेखन प्रियता वाढवणे. हा हव्यास अभ्यासकानी टाळायला हवा. समकाळातील संदर्भाची जागतिक नैतिक मूल्य तत्त्वज्ञानातील विश्लेषण ज्ञान व्यवहारातील चर्चा ही त्या सम काळातील इतिहास नायकाच्या अंगीसर्वस्वी असलेच पाहिजे. हा अट्टाहास तर्क अधिष्ठित व संशोधकीय शिस्त पाळणाऱ्या अभ्यासकांनी हा मोह टाळला पाहिजे .

महाराष्ट्राच्या भागवत संप्रदाय पूर्व काळातील अत्याचारी हिंसावादी जर जर सरंजामशाही जरजर अत्याचार हा सगळा इतिहास नाकारून एकूण नैतिक मूल्यांचा वर्षाव करत राहणे. हे त्या काळातील न रुज्यूलेली मूल्य असताना . सकल जनवादी छत्रपती शिवराय हे पुस्तक या सर्व अपेक्षा वादाच्या पलीकडे मोठे ज्ञान साधन म्हणून स्वीकारावेच लागेल यातील ब्रिटिशकालीन अधिकारी महाराष्ट्र बाहेरील इतिहासकार अशा अनेक संदर्भ ग्रंथांची अधिक भाषांतरित विश्लेषण यात आली असती तर या पुस्तकाची महत्ता वाढलीच असती.

एकूणच सकल छत्रपती शिवराय या ग्रंथाचे लेखक प्रकाश पवार यांनी नवनीत दृष्टिकोन स्वतःच्या विश्लेषणातून मांडणे अभिप्रेत होते. संदर्भचे ओझे हे ज्ञान नसते .तो आधार असतो. ज्ञान हे स्वतः लेखकाच्या चिंतन दृष्टिकोन व समाज शास्त्रीय अंतर्गत घटनांची शोध घेऊन मांडण्याची कृती करावी लागते.

सकल जनवादी छत्रपती शिवराय हे पुस्तक अशी दर्शनीक व निरंतर महाराष्ट्राच्या मनावरती नव्याने रुजतील अशी तात्विक मांडणी या पुस्तकात हवी होती. विश्लेषण अकादमीक मांडणी अकादमीक संदर्भ आले आहेत मात्र या पुस्तकात स्वयं मताचा अभाव आहे.

एकूणच सोळाव्या शतकातील पाश्चात्य ज्ञान व्यवहारातील चर्चा मूल्य विचार एकूणच राजकीय रणनीती आणि प्रभाव हा भारतीय इतिहासाच्या व्यक्तिरेखांच्या मध्ये शोधणे तो आढळून येत असेल तर त्याची पुनर मांडणी करणे आणि भारतीय इतिहास लेखनाचे मूल्य दृष्टिकोन पुनर्प्रस्थापित करणे हा नवा इतिहास लेखनाचा प्रयत्न या पुस्तकात केलेला दिसून येतो त्यामुळे हे पुस्तक महाराष्ट्राच्या जनमनात वंशवाद वाढवत असताना इतिहासाचे विकृतीकरण चालू असताना हे पुस्तक सकल जनवादी छत्रपती शिवराय हा नवामूल्य विचार प्रस्थापित करण्यास नव्याने विश्लेषित करण्यास मदत करेल. पूर्व अभिमानवादी, शत्रु गृहीतवादी धर्मसरक्षणवादी विशिष्ट जात व सरंजामवादी यांसर्वांच्या पलीकडे राजा शिवाजी होता. हा नवा दृष्टिकोन रुजवण्यास हे पुस्तक सतत उपयोगी पडेल. म्हणून सुरुवातीला स्व प्रक्षेपित केलेला मूल्य वर्षाव हा जरी काही अप्रिय भाग वाटला तरीही इतिहासाचा नवा दृष्टिकोन शिवचरित्राकडे पाहण्याचा या पुस्तकाने नव्याने मांडला आहे. त्याचे श्रेय या लेखकाला देणे .हे मराठी भाषिक वाचकांचे निरपेक्ष आणि उदात्त वर्तन ठरते.

– शिवाजी राऊत, सातारा

# नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्यासाठी केंद्र शासन सकारात्मक : केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात गुंतवणूक वाढवणे, विद्युत ऊर्जा बॅटरी संचय प्रणालीसाठी निर्णय घेणे, वीज वितरण क्षेत्रातील कामात कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे, स्मार्ट मीटर बसवीणे तसेच केंद्र शासनाच्या नियंत्रणातील अन्य विषयांवर प्राधान्यक्रम ठरवून कालबद्ध उपाययोजना करण्यात येतील, असे केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी सांगितले. उदयसारखी योजना केंद्र सरकारने पुन्हा आणावी तसेच वित्त पुरवठा व्याजदर कमी असावेत, लेव्ही रद्द करावी, महावितरण ही ऊर्जा क्षेत्रातील देशातील मोठी कंपनी असून व्याजमुक्त बाँड्स जारी करण्याची परवानगी द्यावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या.

सह्याद्री अतिथिगृह येथे वीज वितरण कंपन्यांच्या आर्थिक सक्षमता व संबंधित विषयाबाबत मंत्रीगट समितीच्या दुसऱ्या बैठकीत केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तामिळनाडूचे ऊर्जामंत्री व्ही. सेंथील बालाजी, मध्यप्रदेशचे ऊर्जा मंत्री प्रद्युम्नसिंग तोमर, आंध्रप्रदेशचे ऊर्जामंत्री गोट्टीपत्ती रविकुमार, राजस्थानचे ऊर्जामंत्री हिरालाल नागर, उत्तर प्रदेशचे ऊर्जामंत्री सोमेन्द्र तोमर, महाराष्ट्र राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर उपस्थित होते.

केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक म्हणाले की, वीज निर्मिती व खर्च यामधील सन २०२३-२४ च्या आकडेवारीनुसार संपूर्ण देशातील वीज क्षेत्रातील तोटा एकूण १६.२८% इतका आहे. हा तोटा टाळण्यासाठी महाराष्ट्र, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश व गुजरात या राज्यांनी आपली कार्यक्षमता वाढविणे गरजेचे आहे. या राज्यांनी वीज वितरण क्षेत्रातील कामात कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, सरकारी विभागांनी वेळेवर देयके भरणा करावी, राज्य वीज नियामक आयोग (डएठउ) यांनी दर वेळोवेळी निश्चित करावेत, स्मार्ट मीटर बसवणे व नुकसान कमी करणे, वेळेनुसार वीजेचे दर लागू करणे तसेच कर्ज पुनर्रचना, पर्यायी मार्गाने निधी संकलन करावे. वीज वितरण कंपन्यांच्या आर्थिक सक्षमता व संबंधित विषयाबाबत तिसरी बैठक उत्तरप्रदेश येथे होणार असल्याचे केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी सांगितले.

### केंद्र शासनाकडून वित्त पुरवठा व्याजदर कमी असावेत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

'महावितरण'च्या आर्थिक सुस्थितीसाठी राज्य शासन प्रयत्नशील – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महावितरण ही ऊर्जा क्षेत्रातील देशातील मोठी कंपनी आहे. २८% वीज वापर हा कृषीसाठी असून प्रमाण देशात सर्वाधिक आहे. १.१२ लाख कोटींवर महसूल असून ४९% महसूल हा उद्योगांकडून मिळतो. महावितरणची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी राज्य शासन उपाययोजना करत आहे. मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना आणली असून त्यातून सौरऊर्जेवर मोठे काम करीत आहोत. यातून वीज वितरण हानी कमी होईल. विजेचे दर सुद्धा कमी होईल. यातून जो पैसा वाचणार त्यातून सामान्य ग्राहकापासून ते उद्योगापर्यंत सर्वांना वीज स्वस्तात मिळेल, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सौर कृषीपंप सुद्धा मोठ्या प्रमाणात दिले जात आहेत. शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेचा सुद्धा मोठ्या प्रमाणात फायदा होत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतील सर्व घरांसाठी सौर ऊर्जा देण्यात येणार आहे. जवळजवळ ३० लाख घरांना ही वीज मिळेल. त्यातून सुद्धा मोठी क्रांती होणार आहे. अशा सर्व उपायातून ५२% वापर हा नवीकरणीय ऊर्जेवर आणण्याचा प्रयत्न आहे. या क्षेत्रात 'एआय' चा वापर मोठ्या प्रमाणात वाढविला आहे असेही ते म्हणाले. राज्य शासनाने २०२४-२५ या आर्थिक वर्षात ७.५ क्ष्च पर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या ४७ लाख कृषी पंपांचे वीज बिल सरकार थेट 'महावितरण'ला अदा करत आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत १६,००० मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्रातील ४७ लाख कृषी पंपांना १००% सौरऊर्जा पुरवठा होणार असून, 'महावितरण'च्या वीज खरेदी खर्चात मोठी बचत होईल. 'महावितरण'ने विविध उपाययोजना राबवून वीज खरेदी खर्चात ₹६६,००० कोटींची बचत करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे सादर केला आहे. तसेच, पुढील पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने वीज दर कमी करण्याचा प्रस्तावही देण्यात आला आहे. उद्योगांवरील क्रॉस-सबसिडी हटवून, सर्वसामान्य ग्राहकांसाठी वीज दर आणखी परवडणारा करण्याचा मानस आहे, असेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

पॉवर फायनान्स कमिशन, प्रयास, गुजरात, महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश व राजस्थान राज्यातील ऊर्जा विभागांनी यावेळी सादरीकरण केले.

बैठकीला अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. राधाकृष्णन बी. यासह केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे अधिकारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### डॉ.दिपाली काळे यांना उत्कृष्ट पोलीस उपायुक्त तर महादेव राऊत यांना बालस्नेही पुरस्कार जाहीर

सोलापूर : महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगातर्फे आयोजित 'बालस्नेही पुरस्कार २०२४' या पुरस्कारासाठी उत्कृष्ट पोलीस उपायुक्त म्हणून पोलीस उपायुक्त (गुन्हे) डॉ. दिपाली काळे यांना जाहीर झाला आहे.बालस्नेही पुरस्कार २०२४ हा पुरस्कार वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षचे महादेव राऊत यांना सोलापूर शहर विभागातून जाहीर झाला आहे.

पोलीस आयुक्त एम राजकुमार यांच्या नेतृत्वाखाली बालकांच्या संरक्षणार्थ केलेल्या कारवाईबद्दल महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग महाराष्ट्र शासन यांनी दाखल घेऊन हा पुरस्कार जाहीर केला आहे. हा पुरस्कार सोहळा यशवंतराव चव्हाण सेंटर नरिमन पॉईंट मुंबई येथे सोमवार (दि.३) मार्च रोजी दुपारी एक वाजता होणार आहे.

या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला व बालविकास विभाग मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री गृह (शहर) योगेश कदम, महिला व बालविकास विभाग राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांची या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती असणार आहे.

# मराठी भाषा संवर्धनासाठी सर्वांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत : अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रशासनाच्या वतीने नियोजन भवन येथे कार्यक्रमाचे आयोजन

**■ साहित्यिक डॉ. शिवाजी शिंदे, धर्मशाळे, मारुती कटकधोंड, गिरीश दुनाखे यांच्याकडून कवितांचे सादरीकरण**

**■ अप्पर जिल्हाधिकारी यांनी छत्रपती संभाजी महाराज आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर गझल गायन केले**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : राज्य शासनाच्या वतीने दरवर्षी २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येतो. शासनाने सर्व शासकीय व्यवहारात मराठी भाषेचा वापर करावा याबाबत सूचना दिलेल्या आहेत. सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने ही प्रशासकीय व्यवहारात मराठी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. तरी सर्व शासकीय विभागाबरोबरच सर्वसामान्य नागरिकांनीही जाणीवपूर्वक जास्तीत जास्त व्यवहार मराठी भाषेत करावेत व भाषा संवर्धनात पुढाकार घ्यावा, असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी केले.

नियोजन भवन सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त प्रशासनाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर मार्गदर्शन करत होते. यावेळी



उपजिल्हाधिकारी तथा मराठी भाषा अधिकारी अंजली मरोड, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे, प्रांताधिकारी सदाशिव पडदूने, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, महाराष्ट्र साहित्य परिषद जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, साहित्यिक मारुती कटकधोंड, चंद्रकांत धर्मशाळे, गिरीश दुनाखे, तहसीलदार श्रीकांत पाटील, समीर यादव यांच्या सह विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी व साहित्यिक उपस्थित होते.

अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर पुढे म्हणाले की, आपल्या रोजच्या व्यवहारात मराठी भाषेचा वापर वाढवावा. प्रशासन ही मराठी भाषेचा वापर करत आहे. मराठी भाषा वापरत असताना भाषेची शुद्धता ही महत्त्वाची आहे, त्यावरही सर्वांनी जाणीवपूर्वक काम करावे. केंद्र शासनाने अलीकडेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे, त्यामुळे सर्व मराठी भाषिक नागरिकांची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर वाढलेली असून आपल्या भाषेचा जास्तीत जास्त वापर करून भाषा मोठ्या प्रमाणावर वृद्धिंगत होईल तसेच मराठीत साहित्य कृती निर्माण होतील या दृष्टीने सर्वांनी प्रयत्न करावेत, असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. शिवाजी शिंदे म्हणाले की, प्रत्येक कार्यालयात काम करताना कर्मचाऱ्यांनी मराठी भाषेचा वापर केला पाहिजे. शासकीय कार्यालयात मोबाईलच्या अतिवापरामुळे कर्मचाऱ्यांचा परस्परातील संवाद अत्यंत कमी झालेला आहे तरी सर्वांनी परस्परात योग्य संवाद ठेवावा तसेच तो संवाद मराठी भाषेतच करावा असेही त्यांनी सुचित केले. हत्तरसंग कुडल या गावाला पुस्तकाचे गाव ही योजना जाहीर झाली. तसेच मोडनिंब येथे कैलास काटकर यांचे केस कर्तनालय आहे, तेथे त्यांच्या दुकानात जवळजवळ ३५० पुस्तके आहेत आणि दररोज ७० ते ८० लोक तेथे येऊन पुस्तके वाचतात. तेथील पुस्तके वाचणाऱ्या लोकांना विशेष सवलत ते देतात. यातून मराठी भाषेचे संवर्धन होण्यात मोलाची भूमिका बजावली जात आहे असेच उपक्रम जास्तीत जास्त ठिकाणी झाल्यास मराठीचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढेल असे त्यांनी सांगितले.

प्रारंभी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांच्या हस्ते ज्येष्ठ कवी वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

काव्यवाचन-

डॉक्टर शिवाजी शिंदे यांनी माणसे ही कविता सादर केली.

**का अशी माणसाशी वागतात माणसे**
**आपल्याच माणसांना छळतात माणसे**
**किरकोळ कारणांनी पेटतात माणसे**
**का अशी माणसाशी वागतात माणसे**
**कामापुरतीच गोड बोलतात माणसे**
**का अशी माणसाशी वागतात माणसे**

या कवितेतून कवीने सध्या माणसा माणसात कशा पद्धतीचे वागणे वर्तणूक आहे याचे अत्यंत स्पष्टपणे वर्णन केलेले आहे.

त्यानंतर कवी चंद्रकांत धर्मशाळे यांनी माझी मायबोली जगात महान, मारुती कटकधोंड यांनी काळ गिरीश दुनाखे यांनी देवभट ही कविता सादर केली.

तसेच अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांनी जय जय महाराष्ट्र माझा व लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी हे गीत गायले .

जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी प्रास्ताविक केले व मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रम आयोजनाच्या उद्देश सांगितला तसेच या कार्यक्रमात कवींना आमंत्रित केलेल्या असून काव्य वाचनाचा कार्यक्रमही होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. तर कार्यक्रमाच्या शेवटी उपजिल्हाधिकारी अंजली मुरोड यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.




# शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जाणीवा प्रगल्भ कराव्यात : पुनम कोकळगी

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : आधुनिक वैज्ञानिक युग साकारण्यात विज्ञानामुळेच यश मिळाले आहे, त्यामुळे मानव प्रगतीच्या विळख्यात घट्ट बांधला गेला आहे. अशी स्थिती असताना शिक्षण संस्थांनी विज्ञानाकडे प्रगल्भतेने पाहणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जाणीव जागृती रुजावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे अशी अपेक्षा महाविद्यालय विज्ञान विद्या शाखा प्रमुख पूनम कोकळगी यांनी व्यक्त केली.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते

पुढे बोलताना कोकळगी म्हणाल्या विज्ञानाने खूप सारी आव्हाने स्वीकारली वैज्ञानिकांनी देखील आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर आव्हानांवर मात केली मात्र सामाजिक प्रसार माध्यमाच्याद्वारे विद्यार्थ्यापर्यंत चुकीचा संदेश जाणून बुजून पसरवला जात आहे आपण विज्ञान अभ्यासक्रमातून शिकतो ते व्यवहारामध्ये उपयोगात येत नाही अशी माहिती दिली जात आहे ती बंद झाली पाहिजे विज्ञानाने खूप काही दिले आहे देत आहे आणि देणार आहे अशी भावना शिक्षण व्यवस्थेतून विद्यार्थ्यापर्यंत पोहोचली पाहिजे.

प्रारंभी वैज्ञानिक सी व्ही रमण यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा नेहा गंदमल व प्रा प्राची गणेचारी यांनी केले. आभार प्राध्यापिका विद्याश्री वाले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा मनीषा शिंदे प्रा मधुबाला लोणारी यांनी प्रयत्न केले.

# मा. आ. साळुंखे पाटील यांची गोरे कुटुंबियांची सांत्वनपर भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पालकमंत्री जयकुमार गोरे परिवाराचे दीपक आबा साळुंखे पाटील सांत्वन महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे वडील स्वर्गीय भगवानराव (दादा) गोरे यांचे काही दिवसापूर्वी दुःखद निधन झाले माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांनी स्वर्गीय भगवानराव गोरे यांच्या प्रतिमेला अभिवादन करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

नाम जयकुमार गोरे यांच्या बोरोटी वाडी ता. तालुका मान जिल्हा सातारा, येथील निवासस्थानी शुक्रवारी सकाळी साडेनऊ वाजता दीपक आबा साळुंखे पाटील यांनी गोरे कुटुंबियांची सांत्वन्पूर भेट घेतली याप्रसंगी स्वर्गीय भगवानराव गोरे यांच्या प्रतिमेत पुष्पर करून आदरांजली वाहिली व या दुखातून सावरण्याचे बळ गोरे कुटुंबियांना मिळो आणि भगवानराव गोरे यांच्या आत्म्यास चिरं शांती लाभो. अशी प्रार्थना यावेळी माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांनी केली.



# गावगाथा दिवाळी अंकाला मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई वतीने 'ऊत्कृष्ट साहित्यिक अंक' पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील वागदरी येथून प्रकाशित होणारेगावगाथा दिवाळी अंकाचे तिसरे वर्ष असून ग्रामीण संस्कृती, रूढी, परंपरा व ग्रामीण साहित्य, यासोबत ग्रामीण भागातील लेखकांना व्यासपीठ मिळावे या उद्देशाने मागील तीन वर्षांपासून दिवाळी अंक प्रकाशन केले जात आहे. वैशिष्ट्यपूर्ण मुखपृष्ठ, दर्जेदार साहित्यामुळे अल्पावधीतच गावगाथा दिवाळी अंक वाचकांच्या पसंतीस उतरला आहे.मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, दादर सार्वजनिक वाचनालय आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी भाषा गौरव दिनाच्या कार्यक्रमात 'ऊत्कृष्ट साहित्यिक अंक' गावगाथा दिवाळी अंकाला सन्मानित करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार सचिन परब यांच्या हस्ते संपादक धोंडपा नंदे संपादक गावगाथा दिवाळी अंक यांना सन्मान चिन्ह,सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर कवी एकनाथ आव्हाड, कामगारनेते दिवाकर दळवी, संघाध्यक्ष रवींद्र मालुसरे, चितळे उद्योगसमूहाचे राहुल जोगळेकर, दादर सार्वजनिक वाचनालयाचे सेक्रेटरी यतीन कामथे, मराठी विचारधारा प्रतिष्ठानचे विश्वस्त विकास होशिंग उपस्थित होते

**चोरीस गेलेला मुद्देमाल जप्त** | **सापळा रचून केली कारवाई**

# आंतरराज्य टोळीतील बॅग लिफ्टिंग करणारे दोन आरोपी पंढरपूर शहर पोलिसांकडून गजाआड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर पोलीस ठाणे गोरा गु.रा.न.७३०/२०२४/भा. न्या.२०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे दाखल आहे सदरचा गुन्हा हा पंढरपूर शहरातील सरगम चौक येथे असलेल्या एचडीएफसी बँकेच्या बाहेर. घडला असून यातील फिर्यादीची बॅग ही पैशाची चोरीला गेलेली होती त्याप्रमाणे तपास केला असता सदरचा गुन्हा करणारी आरोपी हे. कापर लाटेप्पा पोस्ट बिटरगुंटा ता. कावली जि. विल्लोर, राज्य आंध्र प्रदेश, येथील असल्याची खात्री झाली होती. सदर आरोपींच्या मार्गावर पोलीस होते. त्या टोळीतील आरोपी आंध्रप्रदेश मधून निघाले आहे ते



सोलापूर जिल्ह्यात येणार आहेत अशी खात्रीशीर माहिती मिळाली असल्याने त्या अनुषंगाने पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण श्यामलदाराने सापळा रचून दोन संशयित आरोपींना गुन्ह्यात वापरलेल्या दोन्ही मोटर सायकल सह त्यांना ताब्यात घेतले त्यांच्याकडे चोरी करण्याकरता काही संशयित वस्तूही मिळून आले आहेत चोरीस गेलेल्या रकमेपैकी ३००,०००/रुपये जप्त करण्यात आले आहेत.

मिळून आलेल्या दोन्ही आरोपींना अटक केलेले आहे त्यांची नावे

१) योहान प्रसाद गुडेट्टी वय वर्ष ४६ धंदा मजुरी,

२) रवी नारायण नायडू वय वर्ष ४९ धंदा मजुरी,

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्रीअतुल कुलकर्णी,मा. अप्पर पोलीस अधीक्षक श्री प्रीतम कुमार यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग श्री डॉक्टर अर्जुन भोसले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर पोलीस ठाणे श्री विश्वजीत घोडके, यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री आशिष कांबळे, पो.सा.ई. श्री राजेश गोसावी, पो.स.ई. शरद कदम, सं.पौ.फौ. कल्याण धावणे, पो.ह.३९६ सुरज हेंबाडे, पो. हे.३९८ सिग्मा गोडसे,पो.ह.२२१ प्रसाद आवटी, पो.ह.१७८९ सचिन हेंबाडे, पो.ह.१२५५ विठ्ठल विभूते, पो.ह.१७३६ सचिन इंगळे, पो.को.१९०४ निलेश कांबळे, पो.शि. शहाजी मंडले, पो.शि.१३९० समाधान माने, पो.को.१५१३ बजरंग बिचुगले, चालक पो.को. बडे, तसेच सायबर शाखा सोलापूर ग्रामीण चे पो.शि. रतन जाधव यांनी केले आहे.




# जीवनात मातृभाषेचे महत्त्वाचे स्थान : प्रा. विनोद पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मानवी जीवनामध्ये भाषेचे स्थान अनन्यसाधारण आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात आई जशी महत्त्वाची असते. तिच्याशिवाय आपल्या जीवनाला काहीच अर्थ नसतो तसेच भाषेचे देखील स्थान आपल्या जीवनात महत्वाचे असते. आज मराठी भाषेला अभिजात भाषेच दर्जा प्राप्त झाला आहे आपल्या मराठी भाषिकांसाठी ही बाब अभिमानास्पद अशी आहे. प्रा.पवार यांनी मनोगत व्यक्त करताना संत साहित्य पासून ते अर्वाचीन साहित्य पर्यंत या वेळी आढावा घेतला. कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय ओझर( मिग) येथे कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त जागतिक मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम संपन्न झाला त्याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस. आर.गडाख अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, मराठी भाषेला प्राचीन असा वारसा आहे. वि. वा. शिरवाडकर हे खऱ्या अर्थाने मराठी भाषेचे सुपुत्र आहेत. मराठी भाषेचा विकास आणि संवर्धन करण्यासाठी त्यांनी संघर्ष केला.मराठी भाषेला एका उंचीवर नेऊन ठेवले.असे गौरवोद्गार याप्रसंगी काढले.यावेळी क्रांतीचा जयजयकार कु. सपना गुजर या विद्यार्थिनीने कुसुमाग्रज यांच्या कणा या कवितेचे सादरीकरण केले. डॉ. सुनीता उफाडे यांनी प्रस्ताविकातून वि.वा. शिरवाडकर यांच्या कार्याचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार डॉ. नारायण पाटील यांनी केले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालय सर्व प्राध्यापक, प्राध्यापके तर सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

